N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** शिक्रापुर **Year (वर्ष):** 2019
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0260 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/04/2019 01:42 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 25/04/2019
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 25/04/2019
**Time From (वेळेपासून):** 18:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/04/2019 **Time (वेळ):** 01:32 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/04/2019 01:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 5 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** कोरेगाव भिमा पोलीस चौकी, कोरेगाव भिमा,शिरुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** पर्वतराज विठ्ठल नाबगे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**
(c) **Date/Year of Birth (जन्म** 1978 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | डिंग्रजवाडी,शिरुर,शिक्रापुर ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | डिंग्रजवाडी,शिरुर,शिक्रापुर ,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल बाबुराव कोळेकर | | | 1. ऐ/22, [illegible], हडपसर, हडपसर, हडपसर, पुणे शहर, महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणाऱ्याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम रु.20,000/ | 20,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):** 20,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

शिक्रापुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण

फिर्याद दिनांक 26/04/2019

मी पर्वतराज विठ्ठल नाबगे, मु डिंग्रजवाडी, ता शिरुर, जि पुणे मोबाईल क्रमांक 8830244077, 9881999993 समक्ष शिक्रापुर पोलीस स्टेशन येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन वर नमुद ठिकाणी माझे कुटुंबासह राहणेस आहे. मी किर्लोस्कर [illegible] इंडिया प्रा लि कंपनी, सणसवाडी येथे ऑपरेटर या पदावर कामास आहे. माझे नावे मौ डिंग्रजवाडी गट न 124 मध्ये 1.23 आर क्षेत्र शेतजमीन आहे. माझे शेतजमीनी शेजारी गट नं 125 मध्ये श्री विटकर यांची 1.33 आर क्षेत्र शेतजमीन आहे. माझे व श्री विटकर यांचे नमुद शेतजमीनीच्या बांधावरुन किरकोळ वाद झाले होते. त्याबाबत श्री विटकर यांनी शिक्रापुर पो स्टेशन येथे माझ्या विरुध्द तक्रारअर्ज दिलेला आहे. सदरचा अर्ज पुढील चौकशीसाठी सपोउनि अनिल कोळेकर यांचेकडे दिला. या अर्ज चौकशीमध्ये श्री कोळेकर साहेब, यांनी मला माझ्या मोबाईलवर फोन करुन मला पो स्टेशन मध्ये भेटण्यास बोलाविले. त्याप्रमाणे मी शिक्रापुर पो स्टेशन येथे जावुन श्री कोळेकर यांची भेट घेतली त्यावेळी कोळेकर यांनी माझ्याविरुध्द श्री विटकर यांनी केलेल्या तक्रारी अर्जाबाबत माहिती दिली व प्रकरण आपसात मिटविण्यास सांगितले.त्यानंतर श्री कोळेकर यांनी मला वरचेवर फोन करुन प्रकरणाबाबत चौकशी केली. दि.16/04/2019 रोजी सकाळी 10 व 11 वाजण्याच्या दरम्यान श्री कोळेकर यांनी मला माझे मोबाईलवर फोन करुन दिनांक 18/04/2019 रोजी पो स्टेशन येथे येण्यास सांगितलेप्रमाणे मी पोलीस स्टेशन येथे गेलो असता श्री कोळेकर यांनी तुमचे प्रकरण आपआपसात मिटले नाही तर तुझ्याविरुध्द गुन्हा दाखल करावा लागेल. तसेच गुन्हा दाखल करायचा नसेल तर मला 25,000/- रुपये द्यावे लागतील असे सांगितले. आज दिनांक 25/04/2019 रोजी मी कंपनीमध्ये कामावर असताना सकाळी 10.20 वा श्री कोळेकर यांचा मोबाईल क्रमांक 9823223839 वरुन माझेकडील मोबाईल क्रमांक 8830244077 यावर फोन आला. मी कामात असल्याने श्री कोळेकर यांचा फोन घेतला नाही. त्यानंतर 10.45 वा च्या दरम्यान मी माझेकडील मोबाईल क्रमांक 8830244077 वरुन श्री कोळेकर यांना फोन केला असता श्री कोळेकर यांनी आज सायंकाळी 5 वाजण्याच्या दरम्यान कोरेगाव पो चौकी येथे भेटण्यास बोलावले आहे. मला श्री कोळेकर यांनी लाचेच्या मागणीसाठीच बोलाविले असल्याची माझी खात्री झाल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे सौ कांचन जाधव, पो उप अधिक्षक यांचेशी संपर्क साधला त्याप्रमाणे माझे तक्रारीवर कारवाईसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे सापळा पथक, सौ कांचन जाधव, पो उप अधिक्षक, श्री दत्तात्रय भापकर, पो उप अधिक्षक, पो हवा खान, पो ना माळी व मनपा, पुणे येथील 2 पंच साक्षिदार याप्रमाणे पथक स्विफट डिझायर व टाटा टगो या 2खाजगी वाहनांतुन मी सांगितलेप्रमाणे वाघनारे वस्ती, पेरणे रोड, येथे 16.10 वा चे सुमारास आलो. सदर ठिकाणी सौ कांचन जाधव यांनी माझी व सापळा पथक तसेच मनपा चे पंच साक्षिदार श्री हर्षल सातपुते, व श्री दिपक भिसे यांची



Scanned by CamScanner

ओळख करुन दिली. त्यानंतर मला विचारलेवरुन मी माझी वरीलप्रमाणे तक्रार सांगुन ती स्व:हस्ताक्षरात लिहुन दिली. ही लेखी तक्रार वाचुन दोन्ही पंच साक्षिदार व सौ कांचन जाधव यांनी त्यावर सहया केल्या. त्यानंतर माझे तक्रारीची पडताळणी करणेसाठी मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने लोकसेवक श्री कोळेकर, सहा पो उप निरिक्षक यांची लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करण्याचे ठरविले. त्यानुसार मी व पंच साक्षिदार श्री हर्षल सातपुते असे माझ्याकडे व्हईस रेकर्डर चालु करुन मी श्री कोळेकर यांनी बोलाविलेल्या ठिकाणी कोरेगाव भिमा पोलिस चौकी येथे श्री कोळेकर यांची भेट घेण्यास गेलो असता, मी व लोकसेवक श्री कोळेकर, सहा पो उप निरीक्षक, आमचेत समोरासमोर माझेविरुध्द दिलेल्या तक्रारअर्जाचे कामाविषयी चर्चा झाली. तसेच या चर्चेमध्ये श्री कोळेकर यांनी अर्ज प्रकरणात सहकार्य करण्यासाठी माझ्याकडे 20,000 रुपयांची लाचेची मागणी केल्याचे व लाच रक्कम घेवुन चौकीत बोलाविल्याचे पडताळणी दरम्यान व्हईस रेकर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेल्या माझे व लोकसेवक श्री कोळेकर यांचेतील संभाषणावरुन निषन्न झाले. त्यानंतर मी पुन्हा मला सांगितलेप्रमाणे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी म्हणजे वाघमारे वस्ती, पेरणे रोड या ठिकाणी आलो. या ठिकाणी सौ कांचन जाधव यांनी पंच साक्षिदार यांचेसमक्ष पडताळणीवेळी आमचेतील ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले संभाषण ऐकले असता लोकसेवक श्री कोळेकर यांनी माझ्याकडे 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम कोरेगाव भिमा पोलिस चौकी येथे बोलाविले असल्याने मला दिलेल्या सुचनेप्रमाणे मी लोकसेवक श्री कोळेकर यांना देण्यासाठी आणलेली लाच रक्कम रुपये 20,000 हे हजर केले असता खाजगी वाहनामध्ये मला आणि पंचांना अँथ्रासिन पावडर ची माहिती देऊन त्याचे गुणधर्माबाबत प्रात्यक्षिक दाखविले. त्यानंतर मी हजर केलेल्या लाच रक्कमेच्या नोटांचे नंबर्स एका को-या कागदावर लिहुन घेऊन सदर नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सापळापुर्व कारवाई पुर्ण करणेत आली व सदर नोटा माझ्या पँटच्या पुढील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवण्यात आल्या. सापळा कारवाईचे अनुशंगाने मला, पंचाना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सुचना श्रीमती जाधव मडम व श्री भापकर यांनी दिल्या. त्यानंतर व्हईस रेकर्डर चालू करुन पो.ना. माळी यांनी व्हाईस रेकर्डर माझे शर्टाच्या आतील बाजुस लावून, मला, व श्री सातपुते पंच साक्षिदार यांचेसह कोरेगाव भिमा पोलिस चौकी येथे, लोकसेवक श्री क्रोळेकर यांची भेट घेणेकामी रवाना केले. माझे पाठीमागे वरील पथक खाजगी वाहन चारचाकीतुन कोरेगाव भिमा, पोलिस चौकी येथे येवुन सापळयाचे आयोजन सापळा पथकाने केले. पोलिस चौकीत जावुन मी लोकसेवक श्री कोळेकर यांना भेटलो असता पोलिस चौकीमध्येच श्री कोळेकर यांनी माझेकडुन पंचासमक्ष 20,000/- रूपयाची लाच रक्कम स्विकारली असताना, दिनांक 25/04/2019 रोजी 18.15 वा.चे सुमारास रंगेहाथ पकडले. पंचांसमक्ष आलोसे श्री कोळेकर यांचे कब्जातून लाच रक्कम रुपये 20,000/- हस्तगत करण्यात आली. त्यावेळी दोन्ही पंचासमक्ष लोकसेवक श्री कोळेकर यांना त्यांचे नाव, हुद्दा विचारता त्यांनी आपले नाव अनिल बाबुराव कोळेकर, वय 54, धंदा- नोकरी, सहा. पो उपनिरीक्षक, शिक्रापुर पो स्टेशन रा. सरस्वती कम्पलेक्स, ऐ/22, माळीवाडी, हडपसर असे असल्याचे सांगितले. सदर कारवाईबाबत घटना क्रमाप्रमाणे सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा करण्यात आला आहे. एकंदरीत मी दिनांक 25/04/2019 रोजी दिलेली मुळ तक्रार, त्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 25/04/2019 रोजी करण्यात आलेली पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटना त्या दरम्यान झालेले प्रत्यक्ष व ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण यावरून लोकसेवक अनिल बाबुराव कोळेकर, वय 54, धंदा- नोकरी, सहा. पो उपनिरीक्षक, शिक्रापुर पो स्टेशन रा. सरस्वती कम्पलेक्स, ऐ/22, माळीवाडी, हडपसर यांनी माझे विरुध्दचे अर्ज चौकशीमध्ये माझेवर कारवाई न करण्यासाठी स्वत:साठी वैध परिश्रमीकाहून अन्य परितोषण म्हणुन त्याच्या पदाचा गैरवापर करून माझ्याकडे दिनांक 25/04/2019 रोजी लाच रक्कम रु.20,000/- ची मागणी करुन सदरची लाच रक्कम माझ्याकडुन 18:15 वा. पंचासमक्ष कोरेगाव भिमा, पोलिस चौकी पुणे येथे स्विकाली म्हणून माझी त्यांच्या विरूध्द फिर्याद आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** Ganesh Laxman **Rank (पद):** SI (Sub-Inspector)

**No.(क्र.):** 15101000402GLW **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

Scanned by CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
शिक्रापूर पोलीस स्टेशन
पुणे ग्रामीण

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाम):** SADASHIV GOVIND SHELAR
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PBMAH75604

Scanned by CamScanner